# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २२.०२.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २१/०२/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २१/०२/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ५,१३०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. २१/०२/२०२५ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १,६३,२१०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. २१/०२/२०२५ रोजी पोस्टे बासंबा, वैभव गोळी भंडार डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ कनेरगाव नाका या दुकानामध्ये बासंबा बिट क्र ०४ येथे नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा स्वताच्या फायदयासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा,पानमसाला सुगंधीत तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करण्याच्या उददेशाने वरील वर्णनाचा प्रतिबंधीत केशरयुक्त विमल, विमल पानमसाले, तंबाखुजन्य पदार्थ, असे एकुन ५७,७६८ रू चा माल त्याचे गोळी भांडार दुकानामध्ये साठवुन विक्री करीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.